**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ याची शपथेवर साक्ष

मी शपथपुर्वक निवेदन करतो कीः

माझे नावः विनायक सदानंद शिळदणकर,

वयः ५० वर्षे, व्यवसायः पेंन्टींग,

राहणारः अष्टमी, ता. रोहा, जि. रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए.एल. पवार यांचे मार्फत सुरु.**

०१. अंदाजे ३–४ वर्षापुर्वी पोलीसांनी अष्टमी नाक्यावर माझी कागदावर सही घेतली. आता मला दिनांक ११/०४/२०२३ रोजीचा पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझा अनुक्रमांक ०१ कडे माझा अंगठा आहे.

**साक्षीदार अभियोगपक्षास समर्थन करीत नसल्याने विद्वान सरकारी अभियोक्त्यांनी त्यास उलटतपासणीच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.**

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.११.०४.२०२३ रोजी पोलीसांनी मला व दुसरा पंच नासिर रहमान मिया याला मौजे अष्टमी परिटआळी येथील आरोपीचे घराचे बाजूला असलेलया मोकळया शेडमध्ये पंचनामा करण्याकरीता बोलाविले होते, त्या ठिकाणी पोलीसांना आरोपीचे ताब्यात सफेद रंगाचा प्लॅस्टीक ड्रममध्ये १५ गावठी हातभट्टीची दारू व काळया रंगाच्या टयुबमध्ये १२० लिटर गावठी हातभटटीची दारू, एकुण किंमत रुपये ६,६००/– चा मुददेमाल मिळाला होता, सदर दारुपैकी १८० मि.लि.दारू सी.ए.परिक्षणाकरीता वेगळी सिलबंद करण्यात

आली, त्याचा पोलीसांनी माझेसमक्ष पंचनामा तयार केला, तो मला वाचुन दाखविला व त्यानंतर त्यावर त्यांनी माझा अंगठा घेतला.

०३. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला ओळखतो, त्यामुळे मी त्याला वाचविण्याकरीता आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

सरतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.एम.के. शिंदे यांनी नाकारला.**

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत

SUNIL SAKHARAM MAHALE

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.02.21 15:58:55 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)

दि.२१.०२.२०२५. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.